# AKHIL CO-OP. HOUSING SOCIETY LTD.

**179, Karve Road, Erandwane, Pune – 411 038**
**(Registration No. PNA/HSG/1441/1980 DT. 07.03.1980)**

---

दिनांक २६ नोव्हेंबर २०२२

## सूचना

प्रिय सभासद,

सर्व सभासदांना कळविण्यास अत्यंत आनंद होत आहे कि सोसायटीने नेमलेल्या आर्किटेक श्री. देवेंद्र ढेरे यांच्या कडून दिनांक २४.११.२०२२ रोजी सोसायटीच्या पुनर्विकास या कामी "प्रकल्प अहवाल" (फिजिबिलिटी रिपोर्ट) प्राप्त झाला आहे

रविवार दिनांक ४ डिसेंबर २०२२ रोजी संध्याकाळी ६ ते ७ या वेळेमध्ये **अखिल सहकारी गृहरचना संस्थेतील सभासद आणि त्यांच्या कुटुंबातील सदस्यांसाठी** "प्रकल्प अहवाल" (फिजिबिलिटी रिपोर्ट) चे सादरीकरण करण्यात येणार आहे. सदर सादरीकरणामध्ये "प्रकल्प अहवाल" अंतर्गत सर्व महत्वाच्या मुद्यांचे विश्लेषण आणि सभासदांना मिळू शकणारे फायदे तसेच खबरदारीचे उपाय ईत्यादी विषयावर सविस्तर माहिती दिली जाईल. आणि तदनंतर प्रश्नोत्तराच्या चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे.

सदरचे **सादरीकरण हे स्वतः आर्किटेक श्री. देवेंद्र ढेरे** करणार आहेत.

आपल्या सर्वाना या सादरीकरणासाठी आमंत्रण देतांना समिती सदस्यांना आनंद होत आहे.

सदर सादरीकरण आपल्या सोसायटीच्या आवारात इमारत क्रमांक ३ आणि ४ समोरील मोकळ्या जागेत होणार आहे.

**कृपया सर्वानी बहुसंख्येने सहभागी व्हावे.**

तसेच सर्व सभासदांना सूचित करण्यात येते कि "प्रकल्प अहवाला"चे ज्या सभासदांना प्रत्यक्ष अवलोकन करावयाचे असेल त्यासाठी सदरचा "प्रकल्प अहवाल" सोसायटीच्या कार्यालयात दिनांक ५ डिसेंबर २०२२ पासून दिनांक ११ डिसेंबर २०२२ पर्यंत संध्याकाळी ६.०० ते ७.०० या वेळेत उपलबद्ध असेल.

**खबरदारीचा उपाय म्हणून सदरच्या रिपोर्टची फोटो-कॉपी करण्यास मज्जाव करण्यात येत आहे.**

आपले

अखिल को-ऑप. हौसिंग सोसायटी लिमिटेड

AKHIL CO-OP. HOUSING SOCIETY LTD. Reg. No. PNA/HSG/1441/1980 Dt. 7-3-1980 PUNE-38

अध्यक्ष — पी. एच. ढेरे

सचिव — पी. के. आंबिकर